<u>जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.२, यवतमाळ.</u>

**जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत बांधकाम विभागाची संरचना**

**मा.. मुख्य कार्यकारी अधिकारी**

**मा.. अतिरिक्त मु.का.अ.**

**कार्यकारी अभियंता**
**जि.प. बांधकाम विभाग क्र. १**

१)) उपअभियंता जि.प. बांध.उ.वि.यवतमाळ
२) उपअभियंता जि.प. बांध.उ.वि.कळंब
३) उपअभियंता जि.प. बांध.उ.वि.पांढरकवडा
४) उपअभियंता जि.प. बांध.उ.वि.वणी
५)) उपअभियंता जि.प. बांध.उ.वि.झरी (जामणी)

**शाखा अभियंता**

**कार्यकारी अभियंता**
**जि.प. बांधकाम विभाग क्र. २**

१) उपअभियंता जि.प. बांध.उ.वि.आर्णी
२) उपअभियंता जि.प. बांध.उ.वि.दारव्हा
३) उपअभियंता जि.प. बांध.उ.वि. पुसद
४) उपअभियंता जि.प. बांध.उ.वि.उमरखेड
५) उपअभियंता जि.प. बांध.उ.वि.महागांव

**शाखा अभियंता**

सर्वसाधारणपने उपविभागामध्ये ५ शाखा/सहाय्यक अभियंत्याची पदे मंजुर आहेत.
(महागांव व झरी(जामणी) उपविभागामध्ये ४ शाखा अभियंत्याची पदे मंजुर आहे.)

यवतमाळ जिल्हा परिषदेकडे बांधकाम विभाग क्र.१ व २ मिळून एकुण १६ तालुके आहेत. त्यापैकी जि. प. बांधकाम विभाग क्र.२ कडे एकुण ७ तालुके (आर्णी, दिग्रस, दारव्हा, नेर, महागांव, पुसद, उमरखेड असुन या तालुक्यामधील रस्त्यांची तथा इतर बांधकामे करण्याकरीता एकुण ५ बांधकाम उपविभाग कार्यरत आहे (आर्णी, दारव्हा, पुसद, महागांव, उमरखेड).

जि. प. बांधकाम विभाग क्र.२ कडे इतर जिल्हा मार्ग व ग्रामिण मार्ग अशा दर्जाच्या रस्त्यांची कामे देखभाल व दुरूस्ती करीता शासनाने दिलेली आहेत. रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ मंजुर झाला असून, त्यानुसार बांधकाम विभाग क्र.२ कडे इतर जिल्हा मार्गाची एकुण लांबी १४५१.४६ किमी असुन, त्यापैकी डांबरी रस्ते लांबी ९१७.८१ किमी, खडी रस्ते लांबी १५१.१० किमी, व अपृष्टांकीत रस्ते लांबी ३८२.५५ इतकी आहे. व ग्रामिण मार्गाची एकुण लांबी २९९९.८४ किमी असुन, डांबरी रस्ते लांबी ८९०.१५ किमी, खडी रस्ते लांबी ३८४.५१ किमी. व अपृष्टांकीत लांबी १७२५.१८ किमी इतकी आहे. असे एकुण ४४५१.३० किमी लांबीचे रस्ते देखभाल दुरूस्ती करीता आहेत.

- **३०५४ मार्ग व पुल**

इजिमा व ग्रामा दर्जाच्या रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती करण्याकरीता **३०५४ मार्ग व पुल/सर्वसाधारण व आदिवासी उपयोजना** मधून अनुदान प्राप्त होत असते. सन २००८-०९ पर्यत असे अनुदान शसनाकडून प्राप्त होत होते. परंतु त्यानंतर हे अधिकार जिल्हा वार्षिक योजना मधून जिल्हा नियोजन मंडळ यांना देण्यात आलेले आहे व त्यानुसार सन २००९ पासून या रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती करीता अनुदान जिल्हा नियोजन समिती मार्फत प्राप्त होत आहे.

या योजनेमधून अनुदान मागणी करीता ज्या रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झलेली आहे अशी रस्ते किंवा मा. खासदार, मा. आमदार तथा मा. पदाधिकारी यांनी सुचविलेली रस्त्यांच्या कामांची पहाणी करून कामांचे अंदाजपत्रके तयार करून अशा रस्त्यांचा कार्यक्रम शासन निर्णय क्रमांक जिवायो १००७/ प्रक्र३१ / का-१४४४ / दि. १६.२.२००८ अन्वये दिलेल्या सुचनाचे पालन करून या योजनेचा कार्यक्रम तयार करून मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांना सादर केला जावून जिल्हा वार्षिक योजनाचा आराखडा मा. पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मंजुर करून हया योजनेची अमलबजावणी करण्यात येते. जिल्हा परिषदेकडील रस्त्यांचे तथा इतर कामांना द्यावयाचे प्रशासकीय मंजुरीचे अधिकार हे जिल्हा परिषदेला असल्याने आवश्यक त्या रकमेची कामे मंजुर करून निविदा पध्दतीने ही कामे कंत्राटदाराकडून केली जातात व ग्रामिण भागाचे दळण वळणा करीता या योजनेचा विशेष लाभ दिल्या जातो.

- **रस्ते किरकोळ दुरूस्ती (गट-अ)**

हया योजनेमध्ये जि. प. कडील रस्त्यांची देखभाल व दुरूस्तीं करण्यात येते त्या अंतर्गत रस्त्यांवरील खडडे भरणे, नाली खोदकाम करणे, बाजुपटटया तासणे इत्यादी प्रकारचे रस्त्यांच्या किरकोळ दुरूस्तीचे काम केले जातात.
सदर कामे उपविभागाकडून प्रस्ताव मागवून अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर मंजूर केली जातात.

- **रस्ते विशेष दुरूस्ती (गट - ब व क)**

  सदर योजने मध्ये इजिमा व ग्रामा रस्त्यांचे विशेष दुरूस्ती, डांबरी नुतनीकरण, खडी नुतनीकरण, रूंदीकरण, मोरी, रपटयाची बांधकामे व सुधारणा इत्यादी प्रकारची कामे घेतली जातात. जिल्हा परिषदेने प्रस्तावित केलेली कामे शासन स्तरावर मंजुर होतात.

- **पुरहाणी दुरूस्ती कार्यक्रम**

  पावसाळयामध्ये अतिवृष्टी / पुरहाणीमुळे इजिमा व ग्रामा दर्जाच्या क्षतीग्रस्त झालेल्या रस्त्याची संबधीत उपविभागाकडून सर्वेक्षण करून विभागीय स्तरावर कार्यक्रम तयार करून जिल्हाधिकारी, अधिक्षक अभियंता, व शासन स्तरावर सादर केला जातो. शासनाकडून कार्यक्रमास मंजुरात व निधी प्राप्त होताच सदर कामे निविदा पद्धतीने पुर्ण केली जातात.

- **इतर ग्रामिण विकास कार्यक्रम २५१५**

  लोकप्रतिनीधींनी सुचविलेल्या ग्रामिण भागातील गावांतर्गत रस्ते, गटारे, व अन्य मुलभुत सुविधांच्या कामाचा प्रस्ताव तयार करून शासन स्तरावर मंजुरात घेवून सदर सुविधाजनक कामे केली जातात.

- **खनिज विकास कार्यक्रम**

  हया योजनेत मा. आमदार, मा. खासदारांनी सुचविलेल्या कामास मा. पालक मंत्र्याच्या सभेत कामांना मान्यता घेवून व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिज महामंडळ नागपूर यांचेकडे प्रशासकीय मंजुरातीकरीता सादर केला जातो. शासनाचे निर्देशानुसार सदर कामे मंजुर केली जातात. कामांना मंजुरात प्राप्त होताच निविदा पद्धतीने कामे केली जातात.

- **आमदार / खासदार स्थानिक विकास कार्यक्रम**

  या कार्यक्रमांतर्गत मा. आमदार / मा. खासदार यांनी सुचविलेली कामे जिल्हा नियोजन विभागामार्फत मंजुर होऊन रस्ते, सामाजिक सभागृह, शाळा, वॉल कंम्पाउंड इत्यादी कामे कंत्राटदारांकडून निविदा मागवून केली जातात.

- **तिर्थक्षेत्र / यात्रास्थळ विकास योजना**

  सदरच्या योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन विभागामार्फत क वर्ग तिर्थक्षेत्रा करीता भक्त निवास बांधणे, संरक्षक भिंत बांधणे, वाहणस्थळ बांधणे, परिसर विकास करणे, कॉक्रिट रस्ता व पाय-याचे काम करणे, कंपाऊंड वॉलचे बांधकाम, पाणी पुरवठा व्यवस्था, सांस्कृतीक भवन, रस्त्याची सुधारणा करणे, पोच रस्ता, महाव्दार, स्वच्छतागृह इत्यादी कामे घेतली जातात.

- **सार्वजनिक आरोग्य**

  सदर योजनेअंतर्गत जिल्हा परिषद स्तरावर आरोग्य विभागाच्या इमारती, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, वैद्यकिय / कर्मचारी अधिकारी, कर्मचारी निवासस्थाने, प्रसुतीगृहे इत्यादी कामे घेतली जातात.
  तसेच पशुसंवर्धन विभागाची दवाखाने, कर्मचारी निवासस्थाने इत्यादी कामे पशुसंवर्धन विकास योजने अंतर्गत घेतली जातात.

- **पशुसंवर्धन योजना**

  सदर योजने अंतर्गत जिल्हा परिषद स्तरावर पशु चिकीत्सालय, अनिवासी व निवासी इमारती घेतल्या जातात.

- **३ शिक्षण**

  सदर योजनेअंतर्गत शिक्षण विभागाचे निकडीनुसार सुचविलेली कामे शिक्षण विभागाकडील इमारती व देखभाल दुरूस्तीची कामे घेतली जातात.

**सन २०१५-१६ चे उददीष्ट व साध्य**

| कामे | उद्दीष्ट | साध्य |
|---|---|---|
| अ) तिर्थक्षेत्र योजना (क व ब वर्ग) | | |
| आर्थिक | | |
| (ब-वर्ग) राज्य | ३०.४५ लाख | ३०.४५ लाख |
| (क-वर्ग) जिल्हा योजना समिती | ६३४.४० लाख | ४८५.९९ लाख |
| भौतिक | | |
| क वर्ग | ५४ | ३१ पुर्ण १० प्रगतीत १३ निविदेत |
| ब वर्ग | १ | १ पुर्ण |
| ब) ३०५४अर्थसंकल्पीय कामे<br>कामांची संख्या | ६३+६+६ =७५ | ६० कामे पुर्ण, पुर्ण ६०+५+५=६०<br>४ कामे रदद |
| नविन रस्ते / रस्ते सुधारणा<br>खर्च | ७०.९१ किमी<br>१०६३.८९ लक्ष | ५६.०० किमी<br>८३९.७५ लक्ष |

**जि.प.बांधकाम विभाग क्र.२, यवतमाळ अंतर्गत सन २०१६ - १७ मध्ये असलेल्या योजनांच्या प्रगती बाबतचा गोषवारा**

| अ.क्र | योजनेचे नांव व कामाचे स्वरूप | मंजुर कामे | अंदाजित किंमत | पुर्ण झालेली कामे | प्रगतीतील कामे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | क वर्ग तिर्थक्षेत्र विकास कामे | ४३ | ४६७.४५ | १४ | १९ | ९ कामे निविदेत व १ काम प्राकलनात |
| २ | ब वर्ग तिर्थक्षेत्र विकास कामे | ४ | १४९.८५ | ० | ० | ४ कामे निविदा प्रकियेत |
| ३ | **प्रा.आ.केंद्र बिगर आदिवासी**<br>i) मुळ कामे<br>ii) अनुषंगीक कामे | <br>८<br>१२ | <br>२२१७.२१<br>१०५.१२ | <br>२<br>१२ | <br>६<br>० | <br><br>३ प्राकलन स्तर |
| ४ | **प्रा.आ.उपकेंद्र बिगर आदिवासी**<br>i) मुळ कामे<br>ii) अनुषंगीक कामे | <br>०<br>२७ | <br>०<br>२२५.५३ | <br>०<br>२३ | <br>०<br>३ | <br><br>१ काम रदद |
| ५ | **प्रा.आ.केंद्र (आदिवासी)**<br>i) मुळ कामे<br>ii) अनुषंगीक कामे | <br>०<br>२ | <br>०<br>३०.०० | <br>०<br>२ | <br>०<br>० | - |
| ६ | **प्रा.आ.उपकेंद्र (आदिवासी)**<br>i) मुळ कामे<br>ii) अनुषंगीक कामे | <br>०<br>२ | <br>०<br>८.८७ | <br>०<br>१ | <br>०<br>० | <br><br>१ काम रदद |
| ७ | **३०५४ मार्ग व पुल / सर्वसाधारण रस्ते दुरूस्ती, नुतनीकरण** | ११६ | १४४६.६२ | ७ | १०९ | कामे प्रगतीत |
| ८ | **आदिवासी उपयोजना- बिगर अनुशेष** | २२ | ४११.०० | - | - | प्रशासकीय मान्य प्रकियेत |
| ९ | **आदिवासी उपयोजना - किमान गरजा** | १३ | ३०७.८९ | - | - | मा.जिल्हाधिकारी यांचे कडे प्रशासकीय मान्य प्रकियेत |